51

ISSN 2394-5303

# Printing Area

Special Issue January 2018

International Multilingual Research Journal

Kukadi Education Society's

## SAVITRIBAI COLLEGE OF ARTS

Pimpalgoan Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar.

on

# GST-Advantages and prospects

29th & 30th January 2018




Organized by

**Department of Economics**

Editor
**Prof.Pandarkar B.R.**

Principal
**Dr.Shantilal Ghegade**

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College,
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist Pune-412 208

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

January 2018, Special Issue

Kukadi Education Society's

## Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa

Tal – Shrigonda, Dist-Ahmednagar

**Special Issue**

**On**

# GST-Advantages and Prospects

**Editor**

Prof. Babasaheb Pandarkar

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Printing Area : Interdisciplinary Multilingual Refereed Journal | UGC Approved Sr.No.43053

S.S.Dhamdhere Arts & Commerce College तमसो मा ज्योतिर्गमय

Principal

S.S.Dhamdhere Arts & Commerce College

Talegaon D... ...here, Tal. Shiru...

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

40) GST , Demonetisation & Anti-flower Campaign -Impact on Floriculture Industry || 138
Savita R. Gonte, Dr. K N Bavale, Pune

41) वस्तु व सेवाकर स्वरुप, व्याप्ती - शेती क्षेत्राचे फायदे || 143
डॉ. ज्ञानदेव एकनाथ झिने, सोनई

42) वस्तू व सेवा कर (जीएसटी) वाटचाल अम्मलबजावणी आणि भवितव्य || 146
प्रा. सोमनाथ वसंतराव पाटील, पुणे

43) जी.एस.टी. आणि सर्वसामान्य || 149
प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर, अहमदनगर.

www.विद्यावार्ता.कॉम
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
UGC Approved No.62759
Vidyawarta®
International Multilingual Research Journal
आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
प्रिंटिंग एरिया
UGC Approved No.43053
ISSN 2394-5303

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College,
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist Pune-412 208

तमसो मा ज्योतिर्गमय
S.S.Dhamdhere Arts & Commerce College

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

## || Index ||

01) A COMPARATIVE ANALYSIS OF PRESENT INDIRECT TAX SYSTEM AND GST IN INDIA
Dr. S. K. Dhage, Pune || 11

02) A Research paper on Analysis of VAT
Dr.Smt. Vaishali D.Patil, Prof. Vishwas V. Deshmukh, Pune || 16

03) IMPACT OF GST ON AGRICULTURAL SECTOR
Dr. V. H. Patil, Pune || 19

04) THE CONTOUR OF GOODS AND SERVICES TAX (GST)
Dr. Mrs. V.V. Patil, Nanded || 22

05) The Disability Tax is a significant Disadvantage of the Goods and Service Tax (GST)
Dr. Bhagyashree Athawale, Nashik. || 25

06) A STUDY OF IMPACT OF GST ON THE TRIBALS INVOLVED IN COLLECTION OF TENDU ...
Dr. Chandrakant Bhagvat Chaudhari, Nashik || 28

07) IMPLEMENTATION OF GST IN INDIA AND ITS IMPACT ON SME SECTOR
Dr. Fernandes T. D, Pune || 32

08) Approaches to Study GST and its Advantages and disadvantages in India
Dr. M. A. Raffey, Aurangabad, Mr. Adamane Santosh L., Dist:- Ahmednagar || 36

09) Impact of GST on Agriculture Sector
Dr. G.S.Deshmukh, Parner. || 39

10) जी.एस.टी.चा सामान्य माणसावर होणारा परिणाम
प्रा. डॉ. आसाराम पवार, औरंगाबाद || 42

11) Impact of Goods and Service Tax on Indian Economy
Dr. Desai Ramesh, Pune || 43

12) वस्तू आणि सेवाकर - फायदे आणि भवितव्य
प्रा. सुरेश हिलाल पाटील, प्रा. डॉ. हिरालाल वामन चव्हाण, जळगाव || 46

13) A STUDY OF PROSPECTS AND PROBLEMS OF GST IN INDIA
Dr Bhagwat Bhaurao Gadekar, Nashik || 51



S.S.Dhamdhere Arts & Commerce College, तमसो मा ज्योतिर्गमय, Talegaon Dhamdhere

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College.
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist. Pune-412 208

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area International Research journal | January 2018 Special Issue | 0146

42

# वस्तू व सेवा कर (जीएसटी) वाटचाल अम्मलबजावणी आणि भवितव्य

प्रा. सोमनाथ वसंतराव पाटील
एम.ए,एम.फिल,सेट., अर्थशास्त्र,
एस. एस. ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे
ता. शिरूर, जि. पुणे.
Email-patileco@rediffmail.com

***********

गोशवारा

स्वातंत्र्योत्तर काळात देशातील करप्रक्रियेत आमूलाग्र बदल घडविणारा ऐतिहासिक असा वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर एक जुलै २०१७पासून लागू करण्यात आला आहे. देशभरात एकसमान करप्रणाली असावी असा उद्देश यामागे होता. केंद्र आणि राज्य सरकारद्वारे त्यापूर्वी लागू असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द करून ही करप्रणाली भारतात लागू करण्यात आली. ३० जून २०१७ च्यामध्यरात्री संसदेच्या विशेष अधिवेशनामध्ये राष्ट्रपतींनी जीएसटी लागू झाल्याची अधिकृत घोषणा केली. या नविन कर प्रणालीमुळे संपुर्ण अर्थव्यवस्थेमध्ये प्रचंड बदल होत आहेत.

**कळीचे शब्द**— जीएसटी, वस्तू व सेवा कर, करसुधारणा,

## प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात देशातील करप्रक्रियेत आमूलाग्र बदल घडविणारा ऐतिहासिक असा वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर एक जुलै २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. जीएसटी अंतर्गत देषातविविध वस्तूव सेवांवर० टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, व २८ टक्के असे पाचच कराचे दर आकारले जाणार आहेत.

संविधानाच्या परिशिष्ट ७ च्या केंद्रीय सूची, राज्य सूची व संयुक्त सूचीप्रमाणे भारतामध्येत्रिस्तरीय कर व्यवस्था आहे.

१. केंद्रीय पातळीवरील कर
२. राज्य पातळीवरील कर
३. स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर

थोडक्यात भारतीय कर प्रणाली अत्यंत व्यापक, गुंतागुंतीची व साहजिकच करदात्यांना अवघड तर व्यापार वृद्धीला अडथळा ठरलीआहे. केंद्रिय करावर राज्यसरकार पुन्हा कर लावते.देषात करावर कर आकारल्याने वस्तू व सेवांच्या किमती फुगून भाववाढहोताना दिसते.. कर व्यवस्थेच्या अनावश्यक गर्दीमुळे गोंधळ, गैरकारभार, कर चुकवेगिरी व भ्रष्टाचार वाढला.

## संशोधन पध्दती :—

प्रस्तुत संशोधन हे विश्लेषणात्मक असून दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टे :—

१. वस्तू व सेवा कराची (जीएसटी) वाटचाल अभ्यासने
२. जीएसटीची अम्मलबजावणी प्रक्रिया अभ्यासने
३. जीएसटीचे संभाव्य परिणाम व भवितव्य अभ्यासने

## वस्तू व सेवा कर (जीएसटी) वाटचाल

सन २००० मध्ये तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने अप्रत्यक्ष करांच्या क्लीस्ट प्रणालीतून ग्राहक व व्यवसायाची सूटका करण्याच्या प्रयत्नाची सुरूवात केली. अप्रत्यक्ष कर सुधारणांचा भाग म्हणून केळकर समितीने २००३ मध्ये अशा कराची शिफारस केली होती. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीची तयारी करण्यासाठी कर विध्येयकाचा मसूदा तयार केला होता. त्यावेळी समितीने या मसूदयाचे वर्णन" सर्व दुंखावर एक औषध "असे केले होते. २००६ मध्ये युपीए सरकारने जीएसटी विधेयक तयार केले व २०११ मध्ये ते मांडले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे सर्वात महत्त्वाचे करसुधारणा विधेयक म्हणून वस्तू व सेवा कर विधेयकाचे महत्त्व आहे. या विधेयकामुळे



तमसो मा ज्योतिर्गमय S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist Pune-412 208
Scanned by CamScanner
Scanned with CamScanner

केंद्रीय अबकारी कर, राज्याचा मूल्यवर्धित कर, करमणूक कर, जकात, प्रवेश कर, चैनीच्या वस्तूवरील कर, खरेदी कर यांच्या ऐवजी एकच वस्तू व सेवा कर हा कर असेल.

**जीएसटीची अम्मलबजावणी**

जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर असून यापुढे देशामध्ये वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर लागू राहील. वस्तू व सेवा कर हा इतर सर्व करांची जागा घेणार असून केंद्राच्या व राज्याच्या अनेक करांना तो एकच पर्याय राहणार आहे. वस्तू आणि सेवा करात केंद्राचे ८ कर वआणि राज्याचे ९ प्रकारचे कर असे एकूण खालील १७ कर विलीन झाले आहेत.

**केंद्र सरकारचे कर –**

केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादनशुल्क, उत्पादनशुल्क (औषधी आणि प्रसाधन सामग्री), अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व उत्पादने), अतिरिक्त सीमा शुल्क,विशेष अतिरिक्त सीमा शुल्क, सेवाकर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यशी संबंधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर इ.

**राज्य सरकारचे कर–**

राज्याचा मूल्यवर्धित कर, विक्रीकर, ऐषआराम कर, प्रवेश कर, (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेशकर,वस्तूंवरील प्रवेश कर), करमणूक आणि मनोरंजन कर, जाहिरातीवरील कर, खरेदीकर,वन विकास कर (वनउपजाच्या विक्रीवरील कर) लॉटरी, बेटींग, जुगारावरील कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यशी संबंधित असलेला कर आणि उपकर यांचा समावेश आहे.

**जीएसटी कर आकारणीची पद्धती**

जीएसटी अंतर्गत तीन करांचा समावेश आहे.

- केंद्रीय वस्तू व सेवा कर – उत्पादन शुल्क, सेवा कर, इ. ऐवजी हा कर (सीजीएसटी)
- राज्य वस्तू व सेवा कर – विक्रीकर, कंत्राट कर, ऐशोआराम शूल्क, मनोरंजन कर इ. (एसजीएसटी)
- आंतरराज्य वस्तू व सेवा कर – एका राज्यामधून दूसऱ्या राज्यामधील विक्रीवरील कर (आयजीएसटी)

केंद्र सरकार केंद्रीय वस्तू सेवा कराच्या स्वरूपात कर बसवून त्याची वसुली करणार आहे तर राज्य शासन वस्तू किंवा सेवांच्या किंवा दोन्हीच्या राज्यांतर्गत होणाऱ्या पुरवठ्यावर राज्य वस्तू आणि सेवा कर बसवून करवसुली करणार आहे. जीएसटी हा उपभोगावर आधारित टॅक्स आहे. ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवांचा उपभोग होईल तिथे कर जमा होईल.

**जीएसटीचे विविध करदर**

जीएसटी अंतर्गत १ जुलै २०१७ पासून देषात ० टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, व २८ टक्के असे पाच कर दर ठरविण्यात आले आहेत. या व्यतीरिक्त २८ टक्के गटात असलेल्या वस्तू व सेवा करावर १ टक्के ते १५ टक्के इतका अतिरिक्त अधिभार असेल.

**जीएसटीची जागतिक स्थिती**

जगातील अनेक विकसित देशात वस्तू व सेवा कर पद्धतीची करप्रणाली अस्तित्वात आहे. जीएसटी हा कर काही देशांमध्ये वॅट किंवा मूल्यवर्धित कर म्हणून ओळखला जातो. जागतिक स्तरावर जीएसटी सर्वप्रथम १९५० मध्ये फ्रान्समध्ये वापरला गेला. सध्या सुमारे १६० देशांमध्ये ही कर प्रणाली वापरात आहे. यामध्ये यूरोपियन युनियन आणि एशिया खंडातील श्रीलंका, सिंगापूर आणि चीन या देशांचा समावेश होते.

**जीएसटीचे संभाव्य परिणाम**

- वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे एक राष्ट्र, एक कर आणि एकसंघ बाजारपेठ ही संकल्पना प्रत्यक्षात आकाराला येणार असून त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा येणार आहे.
- वस्तू व सेवा करामुळे देशांतर्गत उत्पादन वाढीस चालना मिळेल व महसुलातही वाढ होईल. ३. वस्तू व सेवा करामुळे व्यापार–व्यवसाय फसवणूक करून टॅक्स चोरी करणाऱ्यांसाठी या कायद्यामध्ये दंडाची आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.
- प्रामाणिकपणे व्यापारी व उद्योगांना या करप्रणालीतून नक्कीच संरक्षण मिळेल त्यामुळे व्यापार वाढेल.
- या कर प्रणालीत केंद्र आणि राज्याचे १७ कर विलीन होणार असल्याने एकच करप्रणालीतून



S.S.Dhamdhere Arts ... Talegaon ... तमसो मा ज्योतिर्गमय
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist Pune-412 208
Scanned by CamScanner
Scanned with CamScanner

कर भरावा लागेल. पुर्वी व्यापाऱ्यांना अनेक प्रकारचे रिटर्नस भरावे लागत मात्र या त्रासातून सुटका होणार असून व्यापाऱ्यांना केवळ एकच रिटर्नस भरावे लागेल.

• वेगवेगळया राज्यात वेगवेगळे मूल्यवर्धित कर कायदे, कर दर यामुळे देशाची विभिन्न आर्थिक क्षेत्रात विभागणी होत होती. तसेच जकात, प्रवेशकर, तपासणी नाके, यासारख्या अडथळयांना सामोरे जावे लागत होते या करप्रणालीमुळे हे थांबेल.

• केंद्र व राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सुटसुटीत व सोपी होईल.

• करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किंमती स्वस्त होऊन त्याचा ग्राहकांना लाभ मिळेल.

जीएसटीमुळे सामान्य लोकांमध्ये प्रश्न हाच आहे की, जीएसटीचे सामान्यांच्या जीवनावर काय परिणाम होणार आहे. त्यासाठी जीएसटीचे वस्तूंच्या किमतीवरील संभाव्य परिणाम अभ्यासल्यास याचे उत्तर मिळते.

सर्वसामान्य लोकांच्या उपभोगाच्या जवळपास ५३ टक्के वस्तूंना जीएसटीमध्ये करमाफी देण्यात आली आहे. ३२ टक्के वस्तूंवर केवळ म्हणजे ५ टक्के कराचा दर असून सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तू करमुक्त ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अन्नधान्य, अंडी, शेती उत्पादने, शेती बियाणे, पुस्तके अशा अनेक वस्तू करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत तर शिक्षण, आरोग्य, लोकल प्रवाससेवासारख्या अनेक महत्वाच्या सेवा ही करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत.

**जीएसटी बाबत आक्षेप**

• देशी व विदेशी मद्य, कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन या गोष्टी जीएसटी क्षेत्राबाहेरील वस्तू आहेत. त्यामुळे मोठा विरोधाभस निर्माण होत आहे. व सरकारच्या हेतुबाबत षंका निर्माण होते. अर्थात ठराविक कालावधीनंतर पेट्रोलियम वस्तू जीएसटीअंतर्गत आणण्याचे प्रयोजन संविधान संशोधन अधिनियमात करण्यात आले आहे. याबाबतचा निर्णय जीएसटी कौन्सीलमध्ये होईल.

• जीएसटीमुळे अनेक राज्यांना महसूल बुडण्याची भीती वाटत आहे. मात्र जीएसटी लागू केल्यानंतर राज्यांना पहिली पाच वर्षे केंद्र सरकार राज्यांना १०० टक्के भरपाई देणार आहे. त्यामुळे राज्यांच्या महसुलातील तोटा भरून निघणार आहे.

• ज्या राज्यातील ग्राहक जास्त असतील त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल. हा निकष बघता उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ यांना करात जास्त वाटा मिळेल. तामिळनाडू, महाराष्ट्र व गुजरात या राज्यांना महसूल बुडण्याची भीती वाटते आहे त्यांना भरपाई दिली जाईल.

• जीएसटीमुळेएक देश एक कर अस्तित्वात येणे आवष्यक असताना कराचे पाच दर केल्यामुळे मुळ तत्वालाच धक्का बसला आहे. अर्थात आज ठरलेले कर दर हे कधीच बदलता येणार नाहीत असेही नाही, भविष्यात दर तीन महिन्यांनी वस्तू आणि सेवा कर परिषदेची बैठक होणार आहेत. त्यात दरांबाबतचा आढावा होईल.

• राज्याच्या अडचणीच्या बाबी तिथे पुन्हा मांडण्याची संधी मिळेल व त्यात आवश्यक ते बदल घडवून आणता येतील. कायद्यातील त्रुटी दूर करता येतील. तसेच आपत्कालीन परिस्थितीत, दुष्काळात राज्याला निधी कमी पडला किंवा अशा अतिमहत्वाच्या प्रसंगांना सामोरं जाण्याची दुर्देवाने वेळ आली तर वस्तू आणि सेवा कर प्रणालीच्या परिशिष्ट २७९ क प्रमाणे विशेष कर लावण्याचे अधिकार राज्याला मिळणार आहेत. त्यामुळे राज्य संकटात असताना उत्पन्न वाढविणे शक्य आहे.

• जीएसटीसाठी व्यापाऱ्यांची अदयाप पूर्ण तयारी झालेली नाही. जीएसटी हे तंत्रज्ञानावर आधारीत करप्रणाली असल्याने, त्यात कोणत्याही प्रकारे काही कागदी व्यवहार नसतील. जीएसटीमध्ये देयक, इनपूट क्रेडीट, प्रत्येक व्यापाऱ्याचे मुल्यांकन, वस्तू सोबत सेवांची जोडणी हे सारे नवे विषय असतील, जे सध्याच्या करप्रणाली पेक्षा पूर्ण वेगळे आहेत.

• देशातीलबहूतांश व्यापारी अजूनही संगणक वापरत नाहीत त्यामुळे त्यांच्यासाठी संगणक प्रणालीचा वापर ही मोठीसमस्या आहे.

**जीएसटीचे भवितव्य**

कोणत्याही कर बदलाचे मूल्यमापन करताना



तमसो मा ज्योतिर्गमय S.S.Dhamdhere ... Commerce College
Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shiru.
Dist Pune-412 208.
Scanned by CamScanner
Scanned with CamScanner

काही महत्त्वाचे प्रश्न लक्षात घ्यावे लागतात. ते म्हणजे या बदलामुळे, करदात्यांवरील कराचा बोझा काही प्रमाणात कमी होइल काषिवाय या बदलामुळे सरकारच्या करउत्पन्नात वाढ होईल का आणि या कर बदलामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धीचा दर वाढेल का जीएसटीमुळे या सर्व प्रष्नांना समाधानकारक उत्तर मिळणार आहे. जीएसटीमुळे व्यवसाय कर भरण्याची सोईस्करता वाढणार आहे. कर चुकवेगिरी कमी होवून कर उत्पन्न वाढणार आहे तर वाढत्या व्यापारामुळे गुंतवणूक, उत्पादन व रोजगार वाढून एकूणच राष्ट्रीय उत्पन्न वाढीस हातभार लागणार आहे.

जीएसटी ही संपुर्ण नविन व क्रांतीकारक बदल घडवणारी कर प्रणाली आहे. तीच्यामुळे करचुकवेगिरीला आळा बसणार आहे. जीएसटीच्या अम्मलबजावणी मध्ये काही अडचणी असल्यातरी या सर्व अल्पकालीन समस्या असून यथावकाष त्या दूर होतील.

**संदर्भ —**

१. Puri V. & Mishra K. (2013), "Indian Economy", 31nd edition, Himalaya Publishing House, Mumbai.

२. Gaurav Dutt & Ashwini Mahajan (2015), "Indian Economy", (71st Revised Edition), S. Chand & Company Ltd, New Delhi.

३. Abda Sachin (May 2017) Effects of goods and services tax on indian economy, International Education and Research Journal.

४. Panda A, and Patel A. ( July 2010) The Impact of GST on the Indian Tax Scence. SSRN Electronic Journal.

५. ओझरकर सु. रा. (२०११)राजस्व, विद्या प्रकाषन नागपूर.

६. पाटील जे. एफ., वस्तू व सेवा कर — कर व्यवस्थेचे विधीलिखित, दैनिक पुढारी, १ जुलै २०१७

□□□

**43**

# जी.एस.टी. आणि सर्वसामान्य

प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर
सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.
मोबा. ९८६०३२८५१८.
Mail. ID - kurumkar८१@gmail.com

**********

**प्रस्तावना -**

वस्तू आणि सेवा करांचे बहुतेक सर्व दर जीएसटी कौन्सिल अर्थात जीएसटी परिषदेने निश्चित केले. त्यानंतर सर्वच प्रसारमाध्यमांतून कोणत्या वस्तू, सेवा नेमक्या किती स्वस्त आणि महाग होणार या विषयी उहापोह सुरु केला. सर्वसाधारणपणे अप्रत्यक्ष करांचे दर बदलले की संबंधित वस्तूंच्या किमतीत किती बदल होईल, हे सहज काढता येते. उदाहरणार्थ अबकारी करांमध्ये तीन टक्के वाढ झाली तर, वस्तूची किंमत किमान तीन टक्क्यांनी वाढणार असा धोशा सर्वच प्रसारमाध्यमांनी लावला आहे. असे साधे, सोपे आणि सरळ गणित वस्तू आणि सेवा कराच्या बाबतीत थेट लागू होणार नाही.

'एक देश एक कर' हे वस्तू आणि सेवा कराचे, म्हणजे गुड्स अॅण्ड सर्व्हिसेस टॅक्स- जीएसटीचे- तत्व. आधुनिक जगात हा कर सर्वात प्रागतिक मानला जातो आणि आता १ जुलैपासून तो भारतातही अमलात येईल अशी चिन्हे आहेत. गेली जवळपास दहा वर्षे या कराविषयी आपल्याकडे विस्तृत चर्चा सुरु आहे. आता ती संपून १ जूलै २०१७ अंमलबजावणी सुरु झाली. आणि तो स्वागतार्हदेखील आहे. कोणामुळे या कराच्या अंमलबजावणीस विरोध झाला, पंतप्रधानपदी मनमोहन सिंग असताना या कराची अंमलबजावणी हाणून पाडणारे आता याच कराच्या अंमलबजावणीसाठी कसे प्रयत्न करीत आहेत, तेव्हा विरोध होता तर आता पाठिंबा का आदी प्रश्नांची उत्तरे शोधण्याची, किंबहुना हे प्रश्नदेखील विचारण्याची, आता वेळ नाही आणि त्याची गरजही नाही.

आतापर्यंत वस्तू आणि सेवा यांच्यावर वेगवेगळा कर लागू होत होता. उत्पादन शुल्क, विक्रीकर, आयातकर, सेवाकर, मनोरंजन



Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College.
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur.
Dist. Pune-412 208
Scanned by CamScanner
Scanned with CamScanner